# प्रेस नोट

## " महाऑनलाईन पोर्टल कार्यशाळा "

जा.क्र. ९७/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांकः—२०/०२/२०१८.

**भंडारा**: पोलीस मुख्यालय येथील मिटींग हॉलमध्ये २० फरवरी २०१८ रोजी मा. पोलीस अधीक्षक भंडारा विनीता साहू यांच्या मार्गदर्शनाखाली "आपले सरकार पोर्टलवर" या विषयावर कार्यशाळा आयोजित करण्यात आली. यावेळी कार्यशाळेला आपले सरकार पोर्टलचे जिल्हा समन्वय अधिकारी श्री. राकेश हिवरे यांनी प्रशिक्षण देवुन मार्गदर्शन केले.

आपले सरकार/महाऑनलाईन पोर्टल वर उपलब्ध पोलीस विभागाकडून पुरविण्यात येणाऱ्या सेवांकरीता जसे १) निमशासकीय, खाजगी संस्था ईत्यादी मध्ये नोकरीकरीता वर्तणुक व चारित्र पडताळणी प्रमाणपत्र २) पेट्रोलपंप, गॅस एजन्सी, बार ईत्यादीकरीता नाऱ्हरकत प्रमाणपत्र ३) शस्त्र परवान्यासाठी नाऱ्हरकत प्रमाणपत्र आणि पारपत्र संबंधाने पोलीस पडताळणी ईत्यादी करीता नागरीक ऑनलाईन अर्ज करीत असतात. पोलीस विभागाकडून पुरविण्यात येणाऱ्या हया सर्व सेवा नागरीकांना ऑनलाईन उपलब्ध करुन देण्यात आले.

यावेळी कार्यशाळेला भंडारा जिल्हयातील सर्व पो.स्टे.चे ठाणेदार तसेच पो. स्टे. ला गोपनीय शाखेत काम करणारे कर्मचारी, सर्व शाखा प्रमुख तसेच कर्मचारी उपस्थित होते.

( आर.आर. नागरे )
प्रभारी पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९४२१७२७१८९

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.